पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते रोटरीच्या डायलिसिस सेंटरचे उद्घाटन

रोटरीने शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपुर्ती सोहळ्यात उत्स्फुर्त सहभाग नोंदवावा

चंद्रपूर, दि. 21 : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते रोटरी क्लबच्या डायलिसिस सेंटरचे उद्घाटन आज करण्यात आले. रुग्ण सेवेसाठी ना नफा ना तोटा या तत्वावर  डायलिसीस सेंटर  कार्यान्वित करण्या-या रोटरी क्लबचा सामाजिक कार्यातील पुढाकार  नेहमीच अभिनंदनीय राहीला आहे. सामाजिक कार्यातील हा पुढाकार कायम राखून रोटरीने शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपुर्ती सोहळ्यात उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यानी याप्रसंगी केले.

रोटरी क्लबकडून डाॅ. बुक्कावर हॉस्पिटलमध्ये तीन डायलिसिस मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे या डायलिसिस सेंटरमध्ये माफक दरात रोज दोन व्यक्तींचे डायलिसिस करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सुविधेचा लाभ  गरजू रुग्णांना घेता येणार आहे.

कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, डॉ. अमरीश बुक्कावार तसेच रोटरीचे पदाधिकारी डॉ. आनंद झुनझुनवाला, रमेश मेहर, महेश मोखाडकर, अजय जयस्वाल, संतोष तेलंग आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.